पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/25/२०१५
दिनांक : ०९/०१/२०१५

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिति
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक **१६/०१/२०१५** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१६/०१/२०१५** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.विधी समिती सभा

**कार्यपत्रिका क्रमांक - ११**

दिनांक : १६/०१/२०१५ वेळ : दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१६/०१/२०१५** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक १९/१२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ९) सभावृत्तांत कायम करणे.

.---------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३, ३७६ व उपविधीनुसार उद्योगधंदा व्यवसाय, साठा परवाने देण्यात येतात. या व्यावसायिकांकडून परवाना फी प्रती वर्षी वसुल करणेत येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ चे तरतूदीस अधिन राहून प्रति वर्षी परवाना फी चे दर निश्चित करण्यात येतात. त्यानुसार प्रचलित सन २०१४-१५ दरामध्ये १०% दरवाढ सर्व उपरोक्त तिन्ही प्रकारच्या परवान्यांसाठी करणेत येऊन सन २०१५-१६ साठी प्रस्तावित दर दर्शविणारे उद्योगधंदा परवाना फी साठी प्रपत्र “अ”, व्यवसाय परवाना फी साठी प्रपत्र “ब”, व साठा परवाना फी साठी प्रपत्र “क” प्रमाणे दर निश्चितीस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/25/२०१५
दिनांक : ०९/०१/२०१५ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.